म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२० .

॥ श्री ॥

# गुरुदत्तपंचक.

१९७३

आणा.

REFBK-0019473
REFBK-0019473



श्री

REFBK-0019473
REFBK-0019473

श्रीगणे[illegible]॥ जयगुरुपादु-
काष्टकप्रारंभः ॥ ज्या संगतीनेंच
विराग झाला ॥ मनोदरींचा ज-
डभास गेला ॥ साक्षात्परात्मा
मज भेटवीला ॥ विसरूं कसा
मीं गुरुपादुकांला ॥ १ ॥ सद्योग
पंथें घरिं आणिलें ॥ अंगेंच
मातें परब्रह्म केलें ॥ प्रचंड तो
बोध रवी उदेला ॥ विसरूं० ॥२॥

चराचरीं व्यापकता जयाची ॥
अखंड भेटी मजला तयाची ॥
परंपदीं संगम पूर्ण झाला ॥ वि-
सरूं० ॥ ३ ॥ जो सर्वदा गुप्त ज-
नांत वागे ॥ प्रसन्नभक्तां निज-
बोध सांगे ॥ सद्भक्तिभावा क-
रितां भुकेला ॥ विस० ॥ ४ ॥
अनंत माझे अपराध कोटी ॥
नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं
॥ प्रबोधितां तो श्रम फार झा-
ला ॥ विसरूं० ॥ ५ ॥ कांहीं म-
ला सेवनही न झालें ॥ तथापि
तेणें मज उद्धरीलें ॥ आतां तरी

अर्पिन प्राण त्याला ॥ विसरूं०
॥ ६ ॥ माझा अहंभाव असे
शरीरीं ॥ तथापि तो सद्गुरु अं
गिकारी ॥ नाहीं मनीं अल्प वि
कार झाला ॥ विसरूं० ॥ ७ ॥
आतां कसा मी उपकार फेडूं ॥
हा देह ओंवाळुनि दूर सोडूं ॥
म्यां एक भावें प्रणिपात केला॥
विसरूं० ॥ ८ ॥ जया वानितां
वानितां वेदवाणी ॥ ह्मणे नेति
नेति तिला जे दुरोनी ॥ नव्हे
अंत ना पार ज्याच्या रुपाला॥
विसरूं० ॥ ९ ॥ जो साधूच्या

अंकित जीव झाला ॥ त्याचा असे भार निरंजनाला ॥ नारायणाचा भ्रम दूर केला॥ वि० ॥ ॥ १० ॥ इतिश्रीनारायणविरचितेगुरुपादुकाष्टकंसंपूर्णम् ॥ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ॥

---

श्रीगणेशायनमः ॥ अथश्रीगुरुदत्तात्रेयनमस्कारस्तोत्रप्रारंभः ॥ सदां प्रार्थितों श्रीगुरूच्या पदांसी ॥ धरीतों शिरीं वंदितों आदरेंसी ॥ धरूनी करीं तारिं या बाळकासी ॥ नमस्कार हा

स्वामि दत्तात्रयासी ॥ १ ॥ मती
हीन मी दीन आहें खरा हो ॥
परी दास तूझा करीं पाखरा
हो ॥ जसें लेकरूं पाळिते माय
कूशीं ॥ नमस्का० ॥ २ ॥ लडी-
वाळ मी बाळ अज्ञान तूझा ॥
गूरूवांचुनी पांग फेडील माझा
॥ तुझ्यावीण दूजा कोण आहे
अस्मांसी ॥ नमस्कार० ॥ ३ ॥
पिताराय बंधु सखा तूंचि देवा
॥ मुलें मित्र सारे सोयरे व्यर्थ
हेवा ॥ कळोनी असें भ्रांति हो
ई अस्मांसी ॥ नमस्का० ॥ ४ ॥

चरित्रें गूरूचीं करी नित्य पाठ
॥ जया भाक्ति लागे पदीं एक-
निष्ठ ॥ तयाचे कुळीं दीप सज्ञा
नराशी ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ वसे
उंबरासान्निध सर्वकाळ ॥ जनीं
काननीं घालवी नित्य काळ ॥
तया सद्‌गुरूचें नाम कल्याण
राशी ॥ नमस्कार० ॥ ६ ॥ श्र-
मोनि गूरूपाशिं तो म्लेंच्छ आ
ला ॥ तया स्फोट रोगांतुनी मु-
क्त केला ॥ कृपेनें तसें स्वामी
पाळीं अह्मांसी ॥ नमस्कार० ॥
॥ ७ ॥ सती आनुसुया सुधी

आदिमाता ॥ त्रयीमूर्ति ध्यानीं मनीं नित्य गातां ॥ हरे रोगपीडा दरिद्रासी नाशी ॥ नमस्का० ॥ ८ ॥ करोनी मनीं निश्चयो अष्टकाचा ॥ जनांनो करा पाठ दत्तात्रयाचा ॥ करीं माधवाच्या सुता दासदासी ॥ नमस्कार हा स्वामि दत्तात्रयासी ॥ ९ ॥ इति श्रीगुरुदत्तात्रेयनमस्कारस्तोत्रसंपूर्णम् ॥

---

॥ आरती दत्तात्रयाची प्रारंभः ॥

त्रिगुणात्मक त्रयमुर्ती दत्त हा

जाणा ॥ त्रिगुणी अवतार त्रैलो
क्य राणा ॥ नेती नेती शब्द न
ये अनुमाना ॥ सुरवर मुनिजन
योगी समाधि नये ध्याना ॥ १
जयदेव जयदेव जयश्री गुरुद-
त्ता ॥ आरति ओंवाळितां ह-
रली भवचिंता ॥ धृ० ॥ सबाह्य
अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥ अभा-
ग्यासी कैसी कळेल ही मात ॥
पराही परतली तेथ कैंचा हेत॥
जन्ममरणाचाही पुरलासे अंत
॥ जय० ॥ २ ॥ दत्त येऊनीयां
उभा ठाकला ॥ भावें साष्टांगे-

सी प्रणिपात केला ॥ प्रसन्न हो-
उनि आशिर्वाद तैं दिधला ॥
जन्ममरणाचा फेरा चुकवीला॥
जय० ॥ ३ ॥ दत्त दत्त ऐसें लाग
लें ध्यान ॥ हारपलें मन झालें
उन्मन ॥ मी तूं पणाची झाली
बोळवण ॥ एका जनार्दनीं श्री-
दत्त ध्यान ॥ जय० ॥ ४ ॥

---

विडा प्रारंभः

विडा घेईं नरहरी राया ॥ धरु-
नी मानवाची काया ॥ यतिवेष
घेऊनीयां ॥ बससी दीनासी

ताराया ॥ धृ० ॥ ज्ञान हें पूगी-
फळ ॥ भक्ती नागवल्लीदळ ॥ वै
राग्य चूर्ण विमळ ॥ लवंगा स-
त्क्रिया सफळ ॥ वि० ॥ १ ॥ प्रे-
मरंगीत कात ॥ वेला अष्टभाव
सहीत ॥ जायफळ क्रोधरहित ॥
पत्री सर्व भूतहीत ॥ वि० ॥२॥
खोबरें हेंचि क्षमा ॥ फोडुनि द्वै-
ताच्या बदामा ॥ मनोजय वर्ख
हेमा ॥ कापुर हे शांतिनामा ॥
वि० ॥ ३ ॥ कस्तुरी निरहंकार
॥ न मिळती हे उपचार ॥ भी-
मापौत्र यास्तव फार ॥ सत्वर

देईं वारंवार ॥ ४ ॥ विडा० ॥

विडा समाप्त.

---

## शेजारती प्रारंभः

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता, करा अवधुता ॥ चिन्मय सुखधामा जाउनी पहूडा एकांता ॥ धृ० ॥ वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला, स्वामी चौक झाडीला ॥ तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला ॥ आतां० ॥ १ ॥ पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती ॥

स्वामी नवविधा भक्ती ॥ ज्ञा-
नाच्या समया उजळूनि लावि-
ल्या ज्योती ॥ आतां० ॥ २ ॥
आशा तृष्णा कल्पनांचा सोडू-
नि गलबला, स्वामी सोडुनि ग
लबला ॥ क्षमा दया शांती दा-
सी उभ्या सेवेला ॥ आतां० ॥
द्वैताचें कपाट लावुनि एकत्र के-
लें, स्वामी एकत्र केलें ॥ दुर्बुद्धी-
च्या गांठी सोडूनि पडदे सो-
डिले ॥ आतां० ॥ ४ ॥ भावा-
र्थाचा मंचक हृदयाकाशीं टां-
गिला, हृदयाकाशीं टांगीला ॥

मनाचीं सुमनें जोडूनि केलें से-
जेला ॥ आतां० ॥ ५ ॥ अलक्ष्य
उन्मनि घेउनि नाजूक दुशेला,
स्वामी नाजूक दुशेला ॥ निरंज
नीं सद्गुरु माझा निजोनिजेला
आतां० ॥ ६ ॥

शेजारती समाप्त.

REFBK-0019473
REFBK-0019473
१८०६३